# युवा विकास आघाडीची आगळीवेगळी 'दुर्गापूजा'

## मुलींना घडवली 'फन फेअर'ची सैर

▶ **बोईसर** (*वार्ताहर*)

नवरात्रीच्या नऊ दिवसांत देवीची पूजा केली जाते. मात्र विरार येथील युवा विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी विरारमधील शारदामाता विद्याश्रम शाळेतील मुलींसाठी एकदिवसीय सहलीचा कार्यक्रम आयोजित केला होता. विरारच्या शारदामाता विद्याश्रमातील ३० मुलींना याझू पार्क येथील फन फेअरची सैर घडवून आणली.

मुली आणि महिलांनाही दुर्गामातेचे रूप मानले जाते. या मुलींना सहलीत सहभागी करून घेऊन एका अर्थाने मानवतेची पूजा करण्यात आली, ही पूजा खरोखरच देवीपर्यंत पोहोचेल, अशी भावना युवा विकास आघाडीचे अध्यक्ष सिद्धार्थ ठाकूर यांनी व्यक्त केली. अनेक महिन्यांनंतर पालकांसोबत सहलीत फिरण्याचा आनंद मिळाल्यामुळे अनेक मुलींना आनंदाश्रूंना वाट करून दिली. विरारच्या शारदाश्रम विद्याश्रमात नेपाळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक, कोल्हापूर, विजापूर या भागांतून आलेल्या मुली शिक्षण घेत आहेत. या मुलींना स्वतःच्या पायावर उभे करण्याची जबाबदारी शारदाश्रमने घेतली आहे. दुर्घटना किंवा अन्य कारणामुळे त्यांच्यावरील माता-पित्यांचे छत्र हरपले आहे. अशा मुलींना शिक्षण देऊन घडवण्याचे काम संस्था करत आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून त्यांना फन फेअरची सैर घडवण्यात आली.

या उपक्रमात युवा विकास आघाडीचे कार्यकर्ते सचिन पंडित, अमित नाईक, मुनाफ शेख, वरुण पुरंदरे, चिराग राऊत, सुनील गवस, सलमान शेख, सुनी भाटीया इत्यादी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. तर याझू पार्कचे डायरेक्टर गौतम लालवाणी यांनीही या उपक्रमाच्या कौतुकास्तव स्वतः या आनंदोत्सवात हजेरी लावली.

